**निशाणी क्रमांक – २९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४</u>**

माझे नांव – मन्मथ संग्राम गोरे,

वय – ६० वर्षे धंदा – शेती,

रा. हाडोळती, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे</u>**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** फिर्यादी ही माझे नातलग अंकुश पळसकर यांची मुलगी आहे. आरोपी क्र.१ तिचा पती आहे. आरोपी क्र.२ ते ५ हे आरोपी क्र.१ चे नातेवाईक आहेत. फिर्यादीचे लग्न सन २०१० मध्ये झाले. लग्नानंतर आरोपी फिर्यादीला घेऊन गेले. तिथून आरोपी फिर्यादीस हैद्राबाद येथे घेऊन गेला. तिथे आरोपीने फिर्यादीला ३ महिने चांगले नांदवले. त्यानंतर आरोपी क्र.१ फिर्यादीस धंद्यासाठी किंवा ऑटो घेण्यासाठी रुपये ७५ हजार आण म्हणून त्रास देऊ लागले. आरोपी क्र.१ चा उदगीर येथे एक प्लॉट होता. आरोपी क्र.१ हैद्राबाद येथून उदगीर येथे आला. त्यानंतर फिर्यादीच्या वडीलांनी मला आरोपी क्र.१ यास समजावण्यासाठी जाऊ असे सांगितले. त्यानंतर मी व फिर्यादीचे वडील उदगीर येथे गेलो. आम्ही आरोपी क्र.१ ला आमची पैसे देण्याची ऐपत नाही, चांगले नांदवा असे सांगितले. आरोपी क्र.१ मान्य करण्यास तयार नव्हता तो पैसेच मागत होता. त्यावेळी आम्ही फिर्यादीला हाडोळती येथे घेऊन आलो. सन २०११ मध्ये आरोपी हाडोळती येथे आले. त्यांनी फिर्यादीस व्यवस्थित नांदवतो असे सांगितले. आम्हाला त्यांच्यावर विश्वास वाटला. आम्ही फिर्यादीला पाठवले. त्यानंतर फिर्यादी व आरोपी क्र.१ उदगीर किवां

हैद्राबाद येथे गेले. परत तिन महिने, चार महिन्याला पैशांसाठी त्रास द्यायला चालू केले. मला फिर्यादीच्या वडीलांनी कसे करावे असे विचारले. मी त्यांना पुन्हा तसेच वागत असतील तर फिर्यादीला घेऊन या असे सांगितले. फिर्यादी सध्या हाडोळती येथे राहते. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.09.23 16:33:49 +0530

दिनांक –२३.०९.२०२५ **(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

माझे नांव – शिवाजी अंकुशराव पळसकर,

वय – ३२ वर्षे धंदा – चालक,

रा. हाडोळती, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे</u>**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. आरोपी क्र.१ माझी बहिण फिर्यादी हिचे पती आहे. आरोपी क्र.२ ते ५ हे आरोपी क्र.१ चे नातेवाईक आहेत. माझ्या बहिणीचे लग्न सन २०१० मध्ये झाले होते. त्यानंतर तिन महिने तिला आरोपींनी व्यवस्थित नांदवले. त्यानंतर आरोपी क्र.१ यास हैद्राबाद येथे जॉब आहे म्हणून आरोपी क्र.१ फिर्यादीस हैद्राबाद येथे घेऊन गेला. तिथे एक महिना तिला चांगले नांदवले त्यानंतर ऑटो घेण्यासाठी तिच्याकडे आरोपी क्र.१ रुपये ७५ हजार मागू लागला. आमची परिस्थिती चांगली नाही असे सांगितल्यानंतर आरोपी क्र.१ ने तिला मारहाण चालू केली. तसेच तो तिला उपाशी ठेवू लागला व घराबाहेर हाकलून देत असे. आम्हला बहिणीने पैशांच्या मागणीबाबत फोनवरून सांगितले. त्यानंतर आठ दिवसांनी आरोपी क्र.१ स्वतः फिर्यादीला घेऊन उदगीरपर्यंत आला. आम्ही समजावण्यासाठी उदगीर येथे गेलो परंतु आरोपी समजून घेण्याच्या मानसिकतेत नव्हता. त्यानंतर आम्ही फिर्यादीस हाडोळती येथे घेऊन आलो. दोन ते तिन महिन्यांनी व्यवस्थित राहतो असे सांगून ते फिर्यादीला उदगीर येथे घेऊन गेला. त्यानंतर ते दोघे पुन्हा हैद्राबाद येथे गेले. त्यानंतर पुन्हा मारहाण, शिवीगाळ ऑटोसाठी चालू

केल्याने आम्ही स्वतःहून फिर्यादीला घेऊन आलो व फिर्याद दिली. सध्या फिर्यादी अमरावती येथे राहते. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

श्रृवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.09.23 16:33:53 +0530

दिनांक –२३.०९.२०२५

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.